# प्रभु तरुण

वर्ष ५४ | अंक ८ | मुंबई | १६ एप्रिल, २०२१ | पाने ६ | किंमत रु. १

*(स्थापना : तारीख २५ ऑगस्ट १९२३)*

**तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?**

**www.prabhutarun.org**

*संपादिका:* **सुहासिनी कीर्तिकर** *कार्यकारी संपादक मंडळ :* **मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**

*संपादकीय*

## एप्रिल फूल

—सुहासिनी कीर्तिकर

'प्रभुतरुण'च्या चिरतरुण मित्रांनो, वाचकांनो, लेखकांनो, चाहत्यांनो, नित्य नवीन संपादकीयाची सवय झालेल्यांनो; यावेळचे आगळेच संपादकीय तुमच्या-माझ्यातला बांधेल नव्याने घट्ट घट्ट पूल. नाही बरं का हे 'एप्रिल फूल'. तरीही लेखाचे नाव आहे एप्रिल फूल!

उष्ण गरम वाऱ्याने
तृष्णा वाढत्या झऱ्याने
एक ऋतू ठाकतो दारी
दर वर्षाची त्याची वारी
वसंत ऋतूची ही चाहूल
हाच हाच का आपला 'एप्रिल फूल'?।।१।।

हाच हाच परीक्षेचा मौसम
अभ्यासाने येई नाकी दम
'पन डरते है क्या हम?'
मेहनत ज्यादा, अभ्यास कम
अशीच द्यायची असते हूल
हाच असतो ज्ञानाचा 'एप्रिल फूल'!।।२।।

यौवनाच्या झुल्यावर झुलता
फॅशन-मैत्रीचा पूल 'झुलता'
पाटर्या, काटर्या. टॅब, मॉब
कॉलेज डेज, सहली करता करता
द्यायचे एखादे प्रेमाचे फूल
लाजलाजऱ्या प्रेमाची धुंद भूल
'अच्छा! असा असतो 'एप्रिल फूल'!।।३।।

संसार करता 'जंतरमंतर'
जुळवून घेता सारे 'तंतर'
रोजचे दळण, रोजचे तंडण-भांडण
तरी तिच्याभोवती त्याचे रिंगण
'व्हॅलेंटाईन' कळीचे होते सुंदर फूल।।४।।
अवीट संसाराचे 'बाळ' गाणे
बाळासंगे दोन दिवाणे
अंगाई, बब्बड गीतांचे सूर
प्रेमी जीवांना लागता हूरहूर
पुन्हा हवेसे एक आणखी मूल
हाच असतो संसाराचा पूल
हां! हा! एप्रिल फूल, एप्रिल फूल।।५।।

जन्म जाहता अधिक वाढणे
कष्ट करूनि खस्ता खाणे
विणूनि असे हे ताणेबाणे
जन्मजन्मांतरिच्या शपथा खाणे
म्हणता म्हणता दिनी एका
सहजचि अपुली 'बत्ती गुल'
विधात्याचा असे हा 'एप्रिल फूल'।।६।।

एप्रिलमाजीच वसे ऋतू 'वसंत'
आंबे, आईस्क्रीम,.. जीभ नसे संत!
असो वा नसो घडीची उसंत
चंगळ-मंगळ मस्ती-दंगा पसंत
आपण होतो 'आपल्यातच मूल'
शीळ घालतो मनीचा बुलबुल
मग हो, कसचा आला 'एप्रिल फूल'?।।७।।

'वॉटस्ॲप'चा, गाण्यांचा, गप्पांचा
करून मैत्रीचा 'झूम' झुलता पूल
दऱ्याखोऱ्यांतून, झऱ्यावाऱ्यातून
पानारानांतून... आतून आतून
हिंडता-सोडता हुरहुरे उदंड खूळ
उन्हाचे चटके, मन भटके
अगदी हटके हटके ही धूळ
एप्रिल फूल! एप्रिल फूल!! एप्रिल फूल!!! ।।८।।

उडत गेला 'करोना'
कोणी त्याला पुसेना
राजकारण, माजकारण
त्यांना लखलाभ धोरण
टोचणार नाही त्यांचा शूल
त्यांचाच करूया एप्रिल फूल!
एप्रिल फूल!! एप्रिल फूल!!!

*विस्तारीत संपादकीय*

## My Tryst with Magnificence

**- Mayura Nayak**



"Zindagi ek Rangmanch hai, aur hum sab is rangmach par kathputliyan hai……" This is the famous dialogue from the movie Anand but describes life perfectly. On this stage, we call life; people take their entry, they perform and exit. Some entries teach us, some please us, some disturb us and some simply enrich us. Meeting Padmabhushan Smt. Kumudini Lakhia (Jayakar) a magnificent dancer, visionary and founder of Kadamb School of dance, was one such enriching experience that I will cherish as a memorable day of my life. Being a trained classical dancer myself in Bharat Natyam under the able guidance of my dance teacher Mrs. Jayshree Vasudevan, I have a special place for this performing art and even more special is a place for my dance guru who has taught me some of my life lessons through dance. So I knew I am meeting one such dance guru who has pioneered Kathak as a dance form, by re-inventing the dance form itself, I was already preempting the aura that will take me by awe and had started researching about her work so I don't make any mistake when I meet her. But all the homework I did suddenly felt futile when I met her in person. Her welcoming family and her endearing personality instantly connected with me. At the ripe age of 91, she could still enthrall anyone with her conversation, her beauty and her eyes that express beyond words. A magnanimous personality with a face that one can watch endlessly, as if lit up by a dozen flash lights, eyes that could travel a distance in the past reliving the beautiful dances she spoke of and hands that subconsciously moved like they are dancing while narrating her experiences with me. I am blessed to have met her and thankful to Mrs. Ketaki and Mr. Rajan Jayakar who arranged this meeting and also were the first to inform us about her. I am even more grateful to her daughter Maitreyi Lakhia for allowing me those precious moments with her even at such difficult times of social distancing. I have tried to capture almost our entire conversation in this interview and I sincerely hope you all see the magic I saw just through this interview

1. At the age of 91 when you look at your journey in dance, if you had to create a performance depicting your life using the 4 basic elements of nature Earth, Water, Wind and Fire, which one would you use and why?

I would choose the earth because I feel nearest to the earth as that is where the energy comes from. Even in dance whether it is Kathak, Bharatnatyam or Kuchipudi the first thing you learn is the foot work, first you learn to stamp your feet and you stamp your feet on the earth and that's where you get the energy from. The energy comes from the earth and then into the body which spreads through the body. It is that earth which makes you move your arms, head, shoulders, so I feel nearest to the earth. The wind comes and goes, water is a necessity and fire is something I

(Cont. on Page 2 col. 1)

विस्तारित संपादकीय

(पान १ कॉलम ४ वरून)

associate with death. Fire burns, but of course I am one of those people who feel death should be celebrated, it is like birth, the way it comes without notice, unannounced! In our Pujas and ceremonies fire is very important, the flame is also lit on good occasions or when you are starting something new. Flame also stands for education and knowledge. But for me, earth gives me life and I take my energy from earth.

2. Being a celebrated name and having won accolades in your accomplishment as a Kathak dancer and composer, which award is dearest to you and why?

I think every award was a great source of happiness for me. To be recognized by your own people, audiences and critics, by people who understand dance and also the younger generation is a wonderful feeling. Every award was special and dear to me, I can't distinguish between them. Even an award given by my little children on my birthday is also very precious to me.

3. In one of your keynote address at the Natya Kala Conference in 2001, you have expressed that envisaging a composition from its beginning, middle and end was so consuming that you would get nightmares to fulfill that creation. What fear are you describing here?

When you do a piece of choreography long or short, it has to have a beginning and end but it also needs a middle, which carries you to the end. It is not easy to do choreography. You can have nightmares and you don't know what to do next. Sometimes the dance came in my dreams and that is how I moved forward. It takes a long time to create one piece of dance. One little piece of 15 minutes can take 3 months and then there is music, costumes, lighting and there can be a story, but I did away with the story. I did a lot of abstract work. Now, you will ask me why… I would say that when I was studying dance with all my gurus, when it came to abhinaya it was always about Gods and Goddesses. I was a little tired of them, so I thought let us give them some rest. Not that I am irreligious, but I am religious about the right things and don't believe in just going to temples and ringing bells. Can dance not stand on its own without having a religious background or story? Is it not a powerful element like music is! Or Painting is! You see one painting of M F Hussain and say WOW! Even if there is no story but just a splash of Hussain, you appreciate it because it is standing on it's own merit. The work of a painter stands on its own, so I wanted to see if dance can stand on it's own, like the way music is. That is how I started doing contemporary work. My first work in this space was 'Dhapkar' in 1973

4. You have been a pioneer in staging Kathak as a dance form in a very different light. How did you create acceptance for innovation in a dance form that is extremely age old and traditional?

For one of my themes called "Duvidha", the heroine was a middle aged, middle class woman who was uneducated, and she was chained to her daily duties towards kids and her husband and other daily chores. But after all the chores are over, children grow up, what will she do? Life is empty! Then she sees magazines, she sees a woman with short hair and some white streak of hair and that woman is surrounded by suited men. Some well dressed men surrounding a small woman in a saree, she is surprised that women can be like that! So she starts imagining herself in that woman's place and thinks that even she can be like that and gets into a "frame" of mind. So on the stage I had made a proper frame and when the heroine goes inside the frame she dances a completely contemporary dance which is her imagination when I used electronic music. And when she is at home we used "Sarod" but there was no "Taal" because she was not in "Taal", as she was off rhythm with so much conflict in her mind. So there was "Sarod" and Electronic music. But when my Gurus in Delhi heard this they said "Yeh kutte billi ki awaz kahan se aa rahi hai" One of the writers in the newspapers said " Kumudini has taken the Indian dance from the sublime to the ridiculous" Such things challenge me and then I do more of that just like a child.

My first work was "Dhapkar" it means "Dhadkan" or the pulse. I wanted to find the pulse of the Kathak dancer, I was so full of kathak with so many years of experience with so many Gurus, multiple rehearsals, so I used to say that if a doctor checks my pulse, he will start saying the Kathak bol. That's how I got the idea of naming it Dhapkar. Some people went gaga over it. I used only the colour white in my costumes and the entire stage presentation that was done was unique and presented differently for the first time way back in 1973. So the criticism I got was people asking me "Kiske Maatam mein aaye hain?" I got a lot of criticism which I didn't take with a pinch of salt but a large teaspoonful of sugar it gives you more and more energy to do exactly the same thing. I have always been like this, you ridicule me about something I will come back stronger and with even more vengeance.

(To be cont. in next issue)

**Wisdom Talks**

# Good Vibes Only !

**-Mr. Veerdhaval Deepak Talpade**

We all have unlimited desires in our life. These desires are sometimes connected with the response of someone else's behavior towards us. It can be an expectation of being loved, being respected or being pampered at times. If we experience or get our desires fulfilled we reciprocate with happiness whole heartedly.

But things turn ugly when it doesn't work as per our wish. That's where one can start getting annoyed or feel neglected or taken for granted. This negativity starts sinking deep inside our sub conscious mind. Once we develop it internally, our mind adopts the negative response towards that person. We start being little judgmental about them and their actions in sequence further while they are around us. This is when we start behaving 'not so good' with them. In such situation, it doesn't take time to create misunderstandings in the relations and people later turn to go on their own ego trips.

We easily skip to think that this battle of emotions will only harm us either by loosing that relationship forever or making our life toxic while carrying it further with those negative emotions filled inside our mind.

If we sit back and analyze the whole scenario, we can conclude one thing for sure that this mainly happened because of expecting others to keep us happy with their response as desired. But we tend to forget that someone else's response is beyond our control and hence building expectations of desired response is the very first root cause of spoiling some healthy relationships. The power of negativity in such situations is so high that we dive deep into the mode of anger and focus only on the list of bad aspects of that person so as to make the other person feel guilty or to make our self feel victimized. While we are experiencing the mood of anger, the words that come out can bleed someone's heart for life. Instead of this, we shall learn to calm down our self and take the situation in our control. This will ensure that we protect some meaningful relations in our life. We should learn to focus on all the good aspects and the memories that we share with that person. This is quite sure that the other person would have done some supportive and good things for us in the past as well. But here you need not make another mistake of comparing it with all the good that you did in the relationship.

We all had some great personalities from the earlier generations in our families and have been hearing about their jovial and joyful nature. I remember hearing out stories from the past that how all our community people use to live together at Girgaon in a joint family environment. The houses were filled with family and friends visiting each other to share all the moments of joys and sorrows together not only during festivals but also during regular times. These are some of the unique values which slowly started disappearing after we all started living in nuclear family with our own comforts. There is no question that we all achieved our comforts but in the league of achieving it we missed the most important factor of 'Valuing People'.

Imagine you are standing in an elevator and a child laying his head on his parent's shoulder is staring at you. That child with that innocent face suddenly starts smiling at you with the utmost pure emotions he had inside his mind while looking at you. What will be your response? You even respond back with a broad smile and maybe you would hold his hand and kiss his palm to express your love towards that stranger kid. Now here the child is the initial source of sharing a positive energy with you and hence you respond with the positive act of loving him back happily. This is what a basic learning we all should remember that it's always good to allow and share only positive thoughts and actions when we are surrounded with people. So if we start practicing sharing of good vibes this way, we are not only making addition of people in our wealth but also grooming our own personality. Spreading happiness in the world is the own way to live a happy and healthy life. Sometimes just by being wealthy rich in terms of money will be of no use if you have very less or no one to stand beside you in your good and bad times. We all should keep investing our time, efforts and money in the relationships that we can nurture for life.

So it's time to look back and count how many people you earned today!

Leaving you all with the below thought.

"Happiness is a choice, not a result. Nothing will make you happy until you choose to be happy. No person will make you happy unless you decide to be happy. Your happiness will not come to you. It can only come from you "– Ralph Marston

Good vibes only!

*

From the heart

# प्रधानबाई

-Anarkali Sandip Velkar

**'बाल विकासा'ला प्रधानबाईकडून प्राधान्य**

सान्ताक्रुझमध्ये ज्यांना सगळे प्रधानबाईंच्या नावाने ओळखत होते त्या माझ्या आजेसासूबाई, श्रीमती कमलिनी रमाकांत प्रधान. आमचं लग्न व्हायच्या एक वर्षापूर्वी १९८९ मध्ये त्यांचे निधन झाले. माझी त्यांची भेट झालेली नाही पण त्यांच्या कर्तृत्वाबद्दल आईकडून व इतर नातेवाईकांकडून खूप ऐकले आहे म्हणून त्यांच्याबद्दल मला लिहावेसे वाटले.

हल्ली बालवाडीला खूप महत्त्व दिले जाते. गेल्या २० वर्षांत इतक्या बाल-वाड्या सुरू झाल्या आहेत की त्यांची गणना करणं खूप कठीण आहे.

पण तुम्हाला माहीत आहे का अशाच एका बालवाडीची सुरुवात १९५० साली झाली होती आणि तीसुद्धा आपल्या ज्ञातीतील एका स्त्रीने केली होती? 'बाल विकास' नावाची शाळा माझ्या आजेसासूबाईंनी सुरू केली होती आपल्या राहत्या घरी.

त्या काळात खूप स्त्रिया शिकत नव्हत्या, नोकरी व्यवसाय करत नव्हत्या तर शाळा सुरू करणं तर दूरची गोष्ट. पण हे धाडसाचे काम श्रीमती कमलिनी प्रधान ह्यांनी केले आणि ती शाळा ३० वर्ष (१९५०-१९८०) यशस्वीरित्या चालवली. ही कामगिरी खूपच प्रशंसनीय आहे.

त्या काळात बालवाडीची संकल्पना अस्तित्वात नव्हती. मुले सहा वर्षाची झाली की त्यांना सहज प्रवेश मिळत असे शाळेत. काही ठिकाणी मुलांना चाचणी परीक्षा द्यावी लागत असे.

कमलिनी प्रधानची इच्छा होती, मुलांनी हसत खेळत शिकावे. निसर्गाच्या सानिध्यातून, खेळांच्या (साधनांच्या) मदतीने शिकावे म्हणून त्यांनी मादाम मॉंटेसरीची संकल्पना जोपासली.

त्या शाळेला सर्वात जवळून ज्यांनी पाहिले, ज्यांनी त्या शाळेची प्रगती जवळून पाहिली त्या माझ्या सासूबाई, श्रीमती नीला वेलकर. तर वाचूया त्यांच्याच शब्दांत त्यांच्या आईबद्दल.

**माझी आई**

कमलिनी प्रधान म्हणजे माझी आई. तिला सुरुवातीला भाषा विषयांची आवड होती. मराठी इंग्रजी आणि संस्कृत या विषयांवर तिचे प्रभुत्व होते. लग्नाआधी तिने सेंट झेवियर्स कॉलेजमधून बी.ए. ऑनर्स केले होते. लग्नानंतर म्हणजे ॲडव्होकेट रमाकांत नारायण प्रधान ह्यांच्याबरोबर १९३८ मध्ये लग्न झाल्यावर तिने बी.टी. केले व दादरच्या किंगजॉर्ज या हायस्कूलमध्ये शिकवू लागली. किंगजॉर्जच्या पिंटो व्हिला या शाखेमध्ये ती शिकवीत असे.

लग्नानंतर सान्ताक्रुझमधील शेठ आनंदीलाल पोद्दार या हायस्कूलमध्ये ती इंग्रजी, मराठी व संस्कृत हे विषय शिकवू लागली. १९४६ डिसेंबरला माझा भाऊ राजीव याच्या जन्मानंतर तिने घरीच शाळा काढण्याचा निर्णय घेतला व अशी 'बाल विकास' या शाळेची सुरुवात झाली.

१९५० ते १९८० या कालखंडामध्ये सबंध सान्ताक्रुझ परिसरामध्ये कमलिनी रमाकांत प्रधान यांच्या 'बाल विकास' या मॉंटेसरी शाळेचे नाव सर्वांना माहीत झाले होते. विविध खेळांच्याद्वारे मुलांना कसे शिकवता येते, त्यांच्या बालमनावर कुठलाही तणाव न येता निव्वळ खेळताना विविध रंगांची व आकारांची ओळख त्यांना काही करून देता येते ते शिकवले जात असे.

सुदैवाने आमच्या 'नारायण निवास' या बंगल्याभोवती सुंदर बगीचा होता. त्यामध्ये गुलाब, मोगरा, जाई, जुई, चमेली व जास्वंद, शेवंती वगैरे निरनिराळ्या रंगांची फुले होती. त्यामुळे विविध रंगांची व आकारांची ओळख मुलांना निर्सगामधूनच, फुलापानांमधून करून देता येत असे. त्यांच्या बालमनावर कुठलाही तणाव न येता त्यांचे शिक्षण हसत खेळत होत असे.

शिक्षणाबरोबरच त्यांना मराठीतील बालगीते, बडबडगीते साभिनय शिकवली जात असत. त्याचबरोबर इंग्रजीतीलही साभिनय म्हटली जात असत.

मुलांना बगीचामध्ये खेळण्यासाठी सुविधा करुन घेतल्या होत्या. झोपाळा, सी-सॉ व घसरगुंडीवर खेळायला मुलांना भरपूर आवडत असे.

१९५३ मध्ये पुण्यातील लक्ष्मीबाई (लानुताई) प्रधान या लेखिकेने 'स्त्री' मासिकामधून आईच्या शाळेवर व तिच्या खेळांवर व शिकवण्याच्या पद्धतीवर लेख लिहिला होता.

माझ्या आईने शाळेची सुरुवात ५-६ विद्यार्थ्यांनी केली होती. अर्थार्जन करण्याचा तिचा उद्देश नव्हता. केवळ स्वत:च्या मुलांसाठी शाळा काढावी हेच उद्दिष्ट होते. तिच्या शाळेची हळूहळू भरभराट होऊन 'बाल - विकास'मधील मुले ही इतकी नावाजली जाऊ लागली की त्या परिसरांतील अनेक शाळांतून (St.Teresa, Sacred Heart, B.P.M व पोद्दार या शाळांतून) चाचणी परीक्षेनंतर मुलांना सहज प्रवेश मिळे.

शिक्षणाबरोबरच वार्षिक स्नेहसंमेलन व सहलींचे आयोजनपण केले जात असे. त्यांचे आयोजन खुद्द माझी आईच करीत असे. तडफदार स्वभाव, समंजस वृत्ती, कुठलेही आव्हान स्वीकारण्याची क्षमता आणि दुसऱ्याला मदत करण्याची वृत्ती माझ्या आईमध्ये असल्याने ती इतकी वर्ष शाळा चालवू शकली.

तर अशारितीने आपल्या ज्ञातीतील आणि इतर ज्ञातीतील मुले बाल-विकासमध्ये शिकली आणि आता आयुष्यात उच्च पदावर आहेत.

कौतुकाची गोष्ट म्हणजे शासनाकडून काहीही मदत नसताना ही शाळा स्वत:च्या हिंमतीवर चालविली.

जी शाळा ५ मुलांनी सुरू झाली, त्या शाळेत १९८० साली जवळजवळ १०० मुले होती आणि शाळा अनेक बॅचेसमध्ये चालत होती. असे म्हणतात यशस्वी पुरुषामागे एक स्त्री असते, पण कमलिनी प्रधानच्या बाबतीत असं म्हणता येईल, की त्यांच्या यशाच्या मागे त्यांच्या पतीचा फार मोठा वाटा होता. हे झाले सासूबाईंचे मनोगत.

३० वर्ष ही शाळा चालवण्याचं संपूर्ण श्रेय श्रीमती कमलिनी प्रधान व त्यांचे पती म्हणजे आजेसासरे ॲडव्होकेट रमाकांत नारायण प्रधान ह्यांना जातं.

उजळत ज्ञान। घडवित बालमन।।
काळाला पालाण घालून जाई। अशा या मम आजेसासूबाई।।

*

# शिक्षकाचा ज्ञानमार्गी अनुभव...

**- गीता आंबवणे**

शिक्षण क्षेत्रात एक शिक्षक म्हणून माझ्या अनुभवाबाबत लिहिण्याची संधी मला श्रीमती गीता आंबवणे यांनी दिली, त्यासाठी मी त्यांची ऋणी आहे. अवघ्या सोळा वर्षाची, दहावीची परीक्षा उत्तीर्ण झाली असतानाच मी विवाहबद्ध झाले. शिक्षण क्षेत्रात कार्यरत असलेल्या शिक्षणतज्ज्ञांच्या कुटुंबांत माझा विवाह होत असल्या-कारणाने माझे पदवीपर्यंतचे शिक्षण मी पूर्ण करेन, असा विश्वास माझे माता-पिता श्रीमती शुभांगी, पिताश्री केशव राणे ह्याना होता, जो त्यांच्या कन्येने (मी) सार्थ केला. माझे श्वशूर श्री. जयसेन जयकर आणि त्यांच्या सुविद्य पत्नी प्राचार्य श्रीमती कल्पना जयकर (सासुबाई) ह्यांनी तीन शाळा सुरू केल्या. शाळेत शिक्षकगण होताच, ज्यामुळे मलाही अध्यापन एक पेशा म्हणून घेणे हे स्वाभाविक होते. पदवी प्राप्तीनंतर मी बी. एड. केले. इयत्ता पांचवी ते दहावीला गणित व विज्ञान शिकवू लागले.

शिकवणे हे मला वाटते माझ्यामध्ये जात्याच आले होते. सेंट लॉरेन्स हायस्कूलमधील माझ्या शैक्षणिक जीवनाच्या १८ वर्षाच्या कारकीर्दीत अनेकांच्या संपर्कात आले. अनेक माझे विद्यार्थी आपापल्या व्यवसायात स्थिरस्थावर झालेले पाहून मानसिक समाधान मिळाले. त्यामध्ये कोणी डॉक्टर, वकील, अभियंता, व्यापारी आणि शिक्षकसुद्धा मला असे विचारून अचंबित करतात की, 'तुम्ही मला ओळखले का? तुम्ही मला शिकवलं, मी तुमचा विद्यार्थी होतो/होते.'

पण एका अनुभवाने मला अत्युच्च समाधान दिलं आणि शिकवलं की विद्यादान हे किती अनमोल असू शकतं.

अशीच एकदा दुपारी चहा घेत असतांना दारावर घंटी वाजली, आणि एका साध्या वेषातल्या मुलाने मला विचारले, ''नीलममिसचं घर हेच आहे का?'' त्याने माझ्याकडे इंग्रजी शिकण्याची इच्छा व्यक्त केली. मी त्याला सांगितले की, ''मी गणित व विज्ञान हे दोन विषय शिकवते, आणि इंग्रजी शिकवीतही नाही.'' तो मुलगा खूप खिन्न झाला, पण त्याने हार मानली नाही. इंग्रजीमधून संभाषण करता यावे, म्हणून त्याला मी इंग्रजी शिकवावे, असे त्याने आवर्जून सांगितले. मी पुन्हा एकदा नाकारण्याचा प्रयत्न केला, आणि शेवटी आठवड्यांतून तीनवेळा सायंकाळी येण्यास सांगितले. तो म्हणाला की, 'मी पूर्ण दिवस घरकाम करतो व मला फक्त दुपारी ३-४च्या दरम्यान मोकळीक असते. त्याची शिकण्याची आवड, आतुरता पाहून मी माझी दुपारची विश्रांतीची वेळ त्याच्याप्रमाणे जमवून घेतली. दुसऱ्याच दिवशी त्याने सुरवात केली, आणि शिक्षणाबाबतचे त्याचे औत्सुक्य पाहून माझ्या मुलांची सर्व गोष्टीची पुस्तके, ऑडिओ बुक कॅसेट आणि अगदी संगीत अल्बमदेखील त्याच्यासाठी बाहेर काढले. विनय हा एक प्रामाणिक मुलगा होता. ज्याने एकही दिवस कधी सुट्टी केली नाही.

महिना संपला आणि त्याने मला माझ्या गुरुदक्षिणेबाबत विचारले. मी त्याला म्हणाले, ''विनय, तू मोठा माणूस होशील आणि चांगली नोकरी मिळवशील तेव्हा तीच माझी गुरुदक्षिणा असेल.'' पण महिन्याच्या प्रत्येक पहिल्या दिवशी, न विसरता तो नेहमी माझ्यासाठी कॅडबरी चॉकलेट आणत असे. आपल्या अल्पशा

(पान ४ कॉलम ३ वर)

मनातले काही...

# स्टेशनवरची एक स्वप्नवत् संध्याकाळ

**-आरती जयेश कोठारे**

मुंबईकरांचं लोकलशी असलेलं नातं तर जगजाहीर आहे. लॉकडाऊनच्या काळात मुंबईकरांची त्यांच्या लाडक्या लोकलशी फारशी गाठभेट होत नव्हती. ओपनअप आणि सामान्य जनतेसाठी लोकल खुली करून दिल्यावर मात्र कित्येकजण आपल्या लाडक्या, मुंबईच्या लाईफलाईनला भेटण्यास सज्ज झाले. मीसुद्धा मध्यंतरी कॉलेजवरून येताना - एकदाच का होईना; पण लोकलने प्रवास करण्याचं सुख कित्येक दिवसांनी अनुभवलं.

शरद तुमच्याआमच्यासारखाच एक मध्यमवर्गीय मुंबईकर. त्याची आणि ओपनअपनंतरच्या त्याच्या लोकल प्रवासाचीच ही कथा.

''काय कंटाळा आलाय....'' शरद मनोमनीच म्हणाला. घामाच्या धारा त्याचं अंग भिजवत होत्या. त्याने डाव्या हाताने त्याची छातीवर घेतलेली बॅग घट्ट धरली होती. उजवा हात मात्र आखडून गेला होता. त्याला कारण म्हणजे शरदचा 'धक्के खाईन; पण हँडल सोडणार नाही' हा स्वभाव! स्वभाव म्हणण्यापेक्षा ही त्याची युक्तीच होती. ट्रेनमध्ये इतकी गर्दी असायची की कधीकधी आपणही या गर्दीच्या लाटेत वाहून जाऊ असे त्याला वाटे. तसं त्याला हात आखडण्याची आता सवय झाली होती. पण याआधी त्याला चिमटे काढायला इतका खरखरीत आणि जड हात त्याच्या हातावर कुणीच ठेवला नव्हता. तो हात कुणाचा? हे वळून बघण्याची तर सोयच नव्हती. 'पुढील स्टेशन...' उद्घोषणा सुरू होताच तो हात शरदच्या हातावरून बाजूला झाला. शरदने सुस्कारा टाकला 'बापरे, हा काय हात होता की काय? बरं झालं त्या बुवाचं स्टेशन लवकर आलं एकदाचं!' दुसऱ्या हातात रुमाल घेऊन घामाने थबथबलेले तोंड पुसतच तो पुटपुटला.

त्याचं स्टेशन आल्यावर कसाबसा गर्दीतून वाट काढत तो उतरला. प्लॅटफॉर्मवर उतरून पुढे चालायला लागला. तोपर्यंत ट्रेन स्थानकातून सुटली होती. आकाश चांदण्यांनी भरलं होतं. नोकरीला लागल्या दिवसापासून रोजच शरदला घरी परतायला रात्र होई. सकाळच्या अंधारात घराबाहेर पडायचं आणि रात्रीच्या अंधारात घरी परतायचं असाच त्याचा दैनंदिन कार्यक्रम होता. कंटाळून जाई तो. आणि कोण कंटाळणार नाही हो? पहाटे उठून लांबवर जायचं व रात्री खचाखच भरलेल्या लोकलमधून - निम्मा प्रवास उभ्याने करून - परतायचं, शिवाय कामाची व महागाईची चिंता शरदसारख्या मध्यमवर्गीयाला आयुष्यभर चिकटलेली असतेच. अगदी दमून जाई बिचारा.

काहीच दिवसांत सरकारनं संचारबंदीची घोषणा केली. संपूर्ण देशात लॉकडाऊन जाहीर झाला. कोरोना विषाणूची लाट जगभरात पसरली होती. सर्वत्र भीतीचं वातावरण होतं. कितीतरी कंपन्या बंद पडल्या. राहिलेल्यांनी वर्क फ्रॉम होम सुरू केलं. शरदची कंपनी नशिबानं सुरू राहिली. शरदनेही इतरांसारखं घरून काम करणं सुरू केलं. साधारण नऊ-दहा महिने हे असेच गेले. मग एके दिवशी ओपनअपची चाहूल लागली. पुढच्या काही महिन्यांमध्येच सामान्य जनतेसाठी ट्रेन्ससुद्धा सुरू झाल्या. ऑफिसेस सुरू झाली. शरदलाही त्याच्या कंपनीतून बोलावणं आलं. ट्रेन्स ठराविक काळच सुरू असायच्या त्यामुळे आज तो थोडा उशीराच निघाला. सकाळच्या वेळी ट्रेनला जास्त गर्दी नसायची. तशीच आजही नव्हती. शरद ऑफिसला गेला व त्याचं काम त्याने संपवलं. सरकारने ठराविक काळापुरत्याच ट्रेन्स चालू ठेवल्यामुळे ऑफिसेस हल्ली लवकर सुटायची. आयुष्यात पहिल्यांदाच तोसुद्धा कामावरून लवकर निघाला. आज मात्र नेहमीसारखी तुफान गर्दी त्याला मिळाली नाही. लॉकडाऊननंतर सगळ्याचाच कायापालट झाला होता.

आज त्याला चक्क परतीचा प्रवासही पूर्णपणे बसून करता आला. आज काहीच धावपळ नव्हती. धक्काबुक्की नव्हती. स्टेशनवर उतरला, थोडावेळ तिथेच रेंगाळला. सहज त्याची नजर वर आकाशाकडे वळली. आज त्याने पहिल्यांदाच कामावरून परतताना संध्याकाळचा संधीप्रकाश पाहिला. ते त्याच्यासाठी एक अविस्मरणीय दृश्य होतं, जे पाहून त्याला एक विलक्षण आनंद झाला. त्या प्रकाशात साऱ्या ढगांना एक सोनेरी किनार आली होती. आभाळ अतिशय सुंदर दिसत होतं. त्याचं मन क्षणात शांत झालं. काही क्षणांसाठी त्याच्या कामाच्या व महागाईच्या चिंतांनी त्याची पाठ सोडली. तो तिथेच खिळून उभा राहिला - त्या संस्मरणीय रंगछटा बघत. सगळे प्लॅटफॉर्म ओस पडले होते. त्याला अचानक जाग आली ती समोर उभ्या असलेल्या ट्रेनच्या भोंग्याने. ट्रेन स्थानक सोडायला सज्ज होती. एक थंडगार वाऱ्याची झुळूक त्याच्या मनाला स्पर्शून गेली, जुन्या दिवसांची आठवण करून गेली. कधीकधी जेव्हा तो ट्रेनच्या दारात उभा असायचा तेव्हा अशीच एक गार झुळूक त्याला स्पर्शून जायची. अचानक त्याला चुकल्याचुकल्यासारखं वाटायला लागलं. जरी समोरचा ओस पडलेला प्लॅटफॉर्म, ती संधिप्रकाशात न्हाऊन निघालेली ट्रेन - हे सर्वच एक स्वप्नवत दृश्य भासत होतं, हे सारं संपूच नये असं वाटत होतं तरीही शरदला कुठेतरी - त्याच्या मनाच्या कोपऱ्यात - चुकल्याचुकल्यासारखं वाटत राहिलं. त्याला चेपून काढणाऱ्या त्या गर्दीची त्याला आठवण येऊ लागली. आजच्या त्याच्या ट्रेनच्या प्रवासात त्याच्या पायावर कुणीही पाय दिला नाही. त्याचा हात कोणाच्याही हाताखाली चिमटला नाही. भक्तिरसाने भरलेली भजनं त्याने आज ऐकली नाहीत. वाऱ्याची अजून एक मंद झुळूक आली. 'आपल्याला घरीही जायचे आहे.' याची त्याला आठवण करून गेली. तो घरी जायला मागे वळला. संधीप्रकाशातल्या त्या ट्रेनचं सुंदर दृश्य त्याच्या डोळ्यात साठलं होतं आणि त्याबरोबरच जुन्या आठवणींनी आलेलं पाणीही....

त्याच्या मनात कायमची कोरली गेली, स्टेशनवरची ती स्वप्नवत् संध्याकाळ....

कुणास ठाऊक कदाचित तुमच्याही मनात अशीच एखादी आठवण कोरली गेली असेल!

⁕

## अभिनंदन

⁎ कु. वैजयंती विश्वास अजिंक्य दहा मीटर एअर पिस्तूल शूटिंगच्या वेस्ट झोन स्पर्धेत सहभागी झाली. विशेष म्हणजे ६४व्या नॅशनल शूटिंग स्पर्धेसाठी ती सलग दहाव्यांदा निवडली गेली. एप्रिल/मेमध्ये ही स्पर्धा नवी दिल्ली येथे होणार आहे. वरळीतील महाराष्ट्र रायफल असोसिएशनच्या श्री. हरेश यांचे मार्गदर्शन तिला लाभले. वैजयंतीने मिळविलेल्या यशाचा अभिमान आहे.

---

(पान ३ कॉलम ४ वरून)

कमाईतून तो कॅडबरी चॉकलेट आणत असे याचे मला खूप कौतुक वाटायचं.

एकदा मी त्याला विचारले, ''मी एक शिक्षक आहे आणि घरी शिकवणी देते हे तुला कसे कळले?''

त्याच्या त्या उत्तराने मी चकित झाले. तो माझा वर्ग विद्यार्थी चिरागच्या घरी काम करीत असे. चिराग त्याला वारंवार माझ्याबाबत सांगत असे, आणि अनेकदा माझे घरही येथून जातांना दाखवीत असे. शेवटी एक दिवस सगळं बळ एकवटून माझ्याकडे येण्याचे धाडस केले, आणि तो हजर झाला. हे ऐकून माझा या मुलाबद्दलचा आदर अधिकच वाढला. मी विनयला जवळपास चारएक वर्ष शिकवले, आणि अचानक तो यायचा बंद झाला. त्याबाबत ना काही सूचना, कॉल, अथवा संदेश. हे फार आश्चर्यकारक होतं, कारण तो एक जबाबदार मुलगा होता. त्याचा संपर्क करण्याचे वारंवार केलेले प्रयत्नही मोबाइलपूर्वीच्या त्या काळात व्यर्थ ठरले, आणि मी थोडी निराशही झाले. कारण, तो काहीही न सांगता, थोडासाच बाकी असलेला कोर्स अर्धवट टाकून गेला होता. मला असेही वाटले का। मी माझी चार वर्ष एका बेजबाबदार मुलासाठी वाया घालविली.

एके दिवशी आम्ही नाशिकला चाललो होतो आणि दुपारच्या जेवणासाठी आम्ही हॉटेल मानसला थांबलो. जेव्हा आम्ही बिल मागितले तेव्हा वेटरने मला सांगितले, की बिलाची आधीच काळजी घेण्यात आली आहे. आमचे जवळपास चार हजार रुपयांचे बिल कोणीतरी दिले, हे जाणून मला आश्चर्य वाटले आणि कुतूहल वाढले. वेटरने मला सांगितले की, रेस्टॉरंट मॅनेजरने बिल भरले आहे आणि आमच्या भोजना- नंतर त्याना मला भेटायला आवडेल. मी मॅनेजरला भेटण्यास सांगितले, आणि त्याला पाहून मी आश्चर्यचकीत झाले. तो विनय होता! अस्खलित इंग्रजीत संवाद साधण्याच्या त्याच्या कौशल्यामुळे त्याला हॉटेल मानसमध्ये वेटर म्हणून नोकरी मिळू शकली. त्याची प्रामाणिकता आणि परिश्रम पाहून हॉटेल व्यवस्थापनाने चार वर्षात त्याला रेस्टॉरंट मॅनेजर बनवले. विनयने माझी मोठ्या अभिमानाने त्याच्या कर्मचाऱ्यांशी ओळख करून दिली व त्यांना म्हणाला, ''यांच्यामुळे मी आज येथे तुमच्यासमोर व्यवस्थापक म्हणून उभा आहे.'' त्याच्या बोलण्याने माझ्या डोळ्यात पाणी तरळले. अशी परिपूर्ती व समाधान मी कधीच अनुभवले नव्हते. कारमध्ये बसून मी देवाचे आभार मानले की त्यांने मला विनयचे भविष्य घडविण्याची संधी दिली.

इतर कोणत्याही व्यवसायाप्रमाणे शिकवण्यामध्यें कठोर परिश्रम आणि जबाबदारी असते. पैसे फारसे नसले तरी त्यातून मिळणारे समाधान मात्र अमूल्य असते.

**-नीलम जयकर**

⁕

The Editor,
Prabhu Tarun

Madam,

Re : Coffee table book on History, Art, Culture & Heritage of Pathare Prabhus.

I am starting the work on my above pet project shortly. I need help and information on following aspects from our community and would request you to circulate this letter in one of the editions of your periodical. Any material or information received and used will be suitably acknowledged. If printing in your periodical is not practical, I could send you a printed Appeal which you could insert in your periodical.

1. Members of our community owned temples or were trustees of temples or managed temples. I would like to have the particulars of such temples as follows :-
   a) History
   b) Original founder or founders
   c) Year of construction of temple
   d) The deities in the temple
   e) Address of the temple
   f) Oldest and latest photos of the temple and deities.
2. There are patron goddesses associated with the Pathare Prabhu families such as Jogeshwari Devi of Jayakars and Talpade etc. I would like to have following particulars:-
   a) Location of the goddess
   b) Oldest and latest photo of the goddess and the shrine such as Cave, temple etc.
   c) Any story or poem associated with the goddess
   d) Surname with which the Goddess is associated.
3. List of typical Pathare Prabhu ornaments, which were in vogue since over Century ago. At the moment I do not want any photo. I just want the name of the ornament or jewellery. Whoever would like to share the photo in future may indicate so.
4. List of typical silverware, brassware and copperware used for various poojas, festivals and rituals. At the moment I do not want any photos, but only name of the item. Whoever wants to share the photos in future may indicate so.
5. Photos of decoration in old style arranged at the time of Ganesh, Gauri and other festivals such as Pithori, Vat-Savitri, Tulsi Vivah etc. including the drawings associated with the event.
6. Old photos of marriage processions, wedding ceremonies, thread ceremonies, festivals and poojas etc.
7. Photos of Pathare Prabhu games such as `Pat' `Bezique',`Taboot Phali' 'Ganjifa', Wagh-Bakri" etc.
8. Photos of miniature items used as decoration in silver, glass, porcelain, ivory, wood, etc.
9. Photos of typical Pathare Prabhu Kitchenware and more particularly used for preparing typical Pathare Prabhu dishes, described in Laanibai's book.
10. Photos of cover page and information page of Laanibai's book giving details of year of publication and edition number.
11. Photo of cover page and information pages of books on history of Pathare Prabhus. Only those books published prior to 15th August 1947.
12. Photo of cover page, information page and image in the books of dramas written by Pathare Prabhus such as "Hoonda" etc. Pathare Prabhus have written may dramas, some were staged and as regards others there is no record whether they were staged.
13. Photos of original art work or prints of Artists M.V. Dhurandhar, Miss Bramhandkar or any other Pathare Prabhu artist, prior to 15th August 1947.
14. Photos of medals and names of recipients such as Rao Bahadur, Diwan Bahadur etc. Many Pathare Prabhus received such honours.
15. Photos of Rangolis on surface, under water and above water drawn at Pathare Prabhu exhibitions or at Diwali and other festivals, prior to 15th August 1947.
16. Photos of Rangoli designs on paper, which vary on different days of Diwali and other festivals.
17. At least 100 year old photographs of males, females and children of Pathare Prabhu families in their traditional or ceremonial dress.
18. Photos and written material on the life of M.R. Jayakar, M.V. Dhurandhar, Moroba Kanoba, Ganpat Sadashiv Rao, K.B. Wasoodew, Shamrao Pandurang, Vinayakrao Hurrychand Jayakar, Dhakji Kashinathji, Dadaji Dhakji, Nanu Narayan Kothare, Lt. Col. Kirtikar etc.
19. Photos of Letter heads of Companies of entrepreneurs from our community who ventured into business such as Dadaji Dhakjee who & Co., Jayakar Bros, Sudheri Match Co. etc. prior to 15th August 1947.
20. Photo of any memorabilia which is unique and throws light on some aspects of our community.
21. Back issues of Prabhu Prabhat and Prabhu Tarun from their inception upto 15th August 1947.
22. Photos of typical Pathare Prabhu family houses from inside and outside showing certain elements such as Wathan, Katera, Osri, outhouse, etc. Photos could be recent but of a property constructed must be more than 100 years.
23. Photos of typical Pathare Prabhu dishes prepared and served in exquisite crockery and with serving cutlery. Photos could be recent but preparations should be original, without any variation, preferably as indicated in Laaniibai's book.
24. Photos of Pathare Prabhu Art and Craft exhibitions held in 1909, 1926 and 1937 as also photos of the exhibits displayed in those exhibitions.
25. Photos of Rangoli demonstration done in Bombay Exhibition at Azad Maidan in 1911 at the time of visit of King George V and Queen Mary.
26. Photos of community institutions such as Pathare Prabhu Charities etc. at the time of their meetings, anniversaries, their logos and on special events prior to 15th August 1947.
27. Photos of Gurus of some families such as Siddharudha Swami etc. with the member of family.
28. Copies of title documents of properties of Pathare Prabhus on parchment paper, plain paper, or copper plates etc. bearing non-judicial stamps or stamp paper prior to 15th August 1947.
29. Photos of household items other than kitchenware such as living room and bedroom furniture, light fittings, telephones, fans, Radios Gramophones, Gas Ovens, Gas Refrigerators, Switchboards, Writing equipment, etc.
30. Photos of Pathare Prabhu dress such as Dagla, Barabandi, Jaama, Pagdi, Sapaat, Joda, European dress, Suspenders, Shela, Shawl, Saris, blouse, ladies jacket etc.

I would request community members to contact me on 9821072417 or rajanjayakar1948@gmail.com, who have any of the above, so that I could do selection of material that would be useful for my research and eventual use in the book. I would request you to contact me as early as possible and preferably within three months after reading this Appeal in any of the periodical, for initial discussion. This is not my book. It is the book of all the Pathare Prabhus. I am only "nimitta maatra". So please cooperate and we will show to the world, the glory of this small community. If anyone wants to sell any of the material that could be useful for the book, I am willing to buy it. Eventually this heritage will have to be preserved in a community museum as and when it happens.

Warm regards,

**--Rajan Jayakar**

✳



## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक,
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर,
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य
१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे,
कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर,
कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे
यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व
कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक
३२) कै. सौ. विजया व श्री. प्रकाश माधव नायक या त्यांच्या आईवडिलांच्या स्मृत्यर्थ उन्मेष प्रकाश नायक
३३) सौ. वृंदा आणि श्री. शाम विनायक जयकर
३४) कै. श्रीमती जयश्री आणि कै. श्री. जयवंत विश्वनाथ कीर्तिकर स्मृत्यर्थ श्री. उमेशचंद्र जयवंत कीर्तिकर
३५) कै. श्रीमती प्रतिमा आणि कै. श्री. धाकलेश्वर बाळाजी जयकर स्मृत्यर्थ सौ. सुप्रिया उमेश कीर्तिकर

## प्रभुतरुणाची डायरी

### नांदा सौख्यभरे

| | | |
|---|---|---|
| २८-०२-२१ | कु. करिश्मा राजेश नवलकर | श्री. अमिष भरत मारू (आं. ज्ञा.) |
| ०१-०३-२१ | श्री. लोकेश चंद्रशेखर धैर्यवान | कु. कस्तुरी दत्तात्रेय खेडेकर (आं.ज्ञा.) |
| ०३-०३-२१ | डॉ. साईराज अजबसेन नवलकर | क. त्वरिता अनिल वामनराव महाडिक (आं. ज्ञा.) |
| ११-०३-२१ | कु. रिदीमा जितेंद्र रसिक तळपदे | श्री. देवकीनंदन सुनील बहेल (आं. ज्ञा.) |

### विवाह सुवर्ण महोत्सव

| | | |
|---|---|---|
| ३१-०१-२१ | श्री. मीनलकुमार मनोहर तळपदे | कु. अलका केशव कीर्तिकर |

### मरण

| | | | |
|---|---|---|---|
| ०८-०२-२१ | श्री नितीन वसंत देसाई | वय ८१, | ऑपेरा हाऊस |
| १२-०३-२१ | श्री. समीर पुष्पसेन जयकर | वय ६५, | सॅनहोजे कॅलिफोर्निया |
| १३-०३-२१ | श्रीम. सीना सुधाकर कोठारे | वय ८३, | विलेपार्ले |
| २०-०३-२१ | श्रीम. सरोज ललित धैर्यवान | वय ८६, | ठाणे |
| २५-०३-२१ | श्री. सुरेंद्र चंदुलाल राणे | वय ६० | खार |
| ०१-०४-२१ | कु. हेमल भगवंतराव विजयकर | वय ८६, | पुणे |
| ०३-०४-२१ | श्रीम. मेघना (मिता) प्रकाश कोठारे | वय ६१, | राणेवाडी, अंधेरी |
| ०३-०४-२१ | कु. सुषमा विजय नवलकर | वय ६० | मालाड |

## प्रभुतरुणास देणगी

✶ श्रीम. सुमती शामराव त्रिलोकेकर (निधन-८/२/२१) यांच्या आठवणीप्रीत्यर्थ त्यांची नात सौ. भारती विनोद धराधर यांजकडून १५०१/- मन:पूर्वक आभार

## अभिनंदन

✶ ४ मार्च रोजी 'रेन्बो फन डे' या रेडियोवरील कार्यक्रमात 'कायदेविषयक भान' यावर ॲड. केतकी जयकर यांचे भाषण झाले.

✶ श्री. महेश अंबर कोठारे यांना मराठी चित्रपटसृष्टीतील अपूर्व योगदानासाठी 'फिल्म फेअर अवॉर्ड' देण्यात आले.

✶ डॉ. नीलेश विलासचंद्र कोठारे (वसई) यांना VVMC परिसरातील विशेष पारितोषिक NACO and MSACS and SATHII and SVETANA यांच्यातर्फे देण्यात आले.

✶ कु. सानिका दीप विजयकर हिला 'प्रॉडिजी ॲबॅकस कॉम्पिटिशन लेव्हल आठ, कोथरूड ब्रँच, पुणे' तर्फे 'फर्स्ट रनर अप ट्रॉफी' मिळाली.

✶ 'अद्‌भूत गोष्टींचा संग्रह आणि गोष्ट - एक चित्तथरारक पाठलाग' हे मराठी आणि 'माय कलेक्शन ऑफ सुपरनॅचरल ॲंड पॅरानॉर्मल स्टोरीज ॲंड द स्टोरी ऑफ क्राफ्टी जॉर्ज ॲंड हिज डिकेड वेज' हे इंग्रजी - अशा विनय त्रिलोकेकर यांच्या दोन पुस्तकांचे प्रकाशन श्री. कुणाल विजयकर यांच्या हस्ते झाले.

## पाठारे प्रभु चॅरिटीज

दरवर्षी डिसेंबर उजाडला की भविष्यातील उभरते कर्तृत्ववान विद्यार्थी एकत्रित एका मंचावर पाहण्याची आपल्या सर्वांना पा. प्र,. चॅरिटीजने सवय लावली आहे. डोळ्यांना, कानांना तृप्त करणारा असा चॅरिटीजचा विद्यार्थी गौरव समारंभ दरवर्षीच अनुपम असतो. गेली सत्तावीस वर्षे समस्त प्रभुजनांना अंगवळणी पडलेल्या या सोहळ्याने सध्याच्या परिस्थितीमुळे वेगळे वळण घेतले.

अठ्ठावीस फेब्रुवारी रोजी हा सोहळा 'व्हर्च्युअल इव्हेंट' बनून जगभराच्या परभांपर्यंत पोहोचला. नेहमीप्रमाणेच सूत्रसंचालन चॅरिटीजच्या विश्वस्त सौ. मेधा वाझकर आणि सौ. अनारकली वेलकर यांनी केले. सौ. आसावरी धुरंधर यांनी सरस्वतीस्तवन केले आणि 'सर्व मंगल मांगल्ये' या स्तवनावर एलोरा कोठारे (भूतपूर्व विश्वस्त श्री. रघुवीर कोठारे यांची नात) हिने सुरेख नृत्य सादर केले. बासरीच्या धूनवर 'सूर निरागस' घुमल्यावर चॅरिटीजचे अध्यक्ष श्री. उदय शंकरराव मानकर यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. यावर्षी एकूण बेचाळीस मानकरी असल्याचे सांगून त्यांनी खास गुणवंत असणाऱ्यांची नावेही अभिमानाने घेतली. 'प्रत्येकाने आपली आवड ओळखली पाहिजे. माघार घेता कामा नये. आयुष्याची मजा लुटत असताना शिस्त असावी आणि पालक, मित्र यांचा आदर करावा. पालकांनी जे आपल्यासाठी कष्ट केले त्याची जाणीव ठेवावी.' असे थोडक्यात समजुतीचे शब्द विद्यार्थ्यांना ऐकवले. बेचाळीस विद्यार्थ्यांना गौरविताना चॅरिटीजने एकूण चार लाख बावीस हजार चारशे एवढी रक्कम दिल्याचे त्यांनी अभिमानाने सांगितले. हा 'झूम' वरील कार्यक्रम अमित कोठारे या विश्वस्तांनी आयोजित केला होता.

दरवर्षीप्रमाणे विद्यार्थी गौरवगीत नलिनी तळपदे यांचे होते. 'जाहला वीणेचा झंकार' हे गीत सौ. कौमुदी मानकर यांनी सुरेल सादर केले. यावर्षी काही विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. अनुष्का तळपदे, कुंजल वेलकर, स्नेहा कोठारे ही त्यातील काही नावे. बक्षिस समारंभात विद्यार्थ्यांना बक्षिसे देताना तोच तोणणा येऊ नये म्हणून काही कालांतर ठेवून ज्ञातीगायिकांनी आपापली गाणी सादर केली. अतिशय सुरेल अशी. 'कोई ऐसा गीत गाऊ' आसावरी धुरंधरांचे गाणे, 'नयनोंमें कजरा छाए' हे कौमुदी मानकरांचे गाणे म्हणजे 'ऑनलाईन'वरून थेट श्रोत्यांशी कानलाईन जोडणारी लिंक! आसावरीचे 'पसायदान' म्हणजे उंचावर जाणारी सर्वोत्तम कडी.

विश्वस्त श्री. राजन वामनराव जयकर यांनी आभार मानले; तर देणग्यांचे वाचन विश्वस्त संदीप वेलकर यांनी केले. 'विद्यानिष्ठांची मांदियाळी' असलेला हा देखणा सोहळा घरोघरी 'आनंदवन' फुलवणारा ठरला.

✶ 'कलामंच' मध्ये लेख, 'लक्षवेधी' हे 'ललित' मधील सदर आणि 'स्वानंदी' कथासंग्रहास प्रस्तावना... सुहासिनी कीर्तिकर यांचे हे लेखन प्रकाशित झाले.

✶ प्रभुतरुण म्युझिक क्लबतर्फे दहा गायकांनी 'रंग बरसे' हे गाणे आपापल्या घरून धूळवडीच्या दिवशी ऑनलाईन सादर केले.

## सहवेदन

आमचे विश्वस्त श्री. सुनील सुधाकर कोठारे यांच्या मातोश्री श्रीम. सीना यांना देवाज्ञा झाली. श्री. सुनील आणि त्यांच्या समस्त कुटुंबीयांच्या दु:खात आम्ही सहवेदन राखून सहभागी आहोत.

## पा. प्र. महिला समाज

दिनांक २१-०३-२१ रोजी पा. प्र. महिला समाजाची सर्वसाधारण सभा खार पा. प्रा सोसायटी हॉलमध्ये झाली. २० सभासद हजर होते. सर्व ठराव एकमताने मंजूर झाले. त्यावेळी जागेपेक्षा कमी अर्ज आल्यामुळे पंचवार्षिक निवडणूक न होता पुढील भगिनींची अर्जानुसार नेमणूक झाली. सौ.नीता सेजित (विश्वस्त), सौ. साया नवलकर (अध्यक्ष), सौ. नूतन कीर्तिकर (उपाध्यक्ष), सौ. पल्लवी कोठारे (चिटणीस), श्रीमती अपूर्वा धैर्यवान (सं. चिटणीस), सौ. प्रिया कोठारे (कोषाध्यक्ष), कार्यकारी समिती:- सौ. रशमा विजयकर, सौ. निकिता राणे, सौ. उन्नती राणे, सौ. छाया विजयकर, सौ. भैरवी देसाई,श्रीमती शिल्पा धुरंधर, कु. शोभना जयकर.

## परीक्षेतील सुयश

**पीएचडी**

कु. अंबुजा प्रदीप नवलकर

**सीए**

श्री. अभिजीत भूषण प्रधान

**पीजीडीएम**

कु. वैष्णवी एन. कीर्तिकर

हे मासिक मुद्रक, प्रकाशक श्रीमती सुहासिनी कीर्तिकर यांनी मालक बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुण करिता मे. स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ, शाह ॲंड नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४००१०२ येथे प्रकाशित केले.

**संपादक: श्रीमती सुहासिनी कीर्तिकर** RNI NO. 14613/67